ई-गव्हर्नन्स प्रकल्पांतर्गत डीबी-२ लायसन्स देयकाची उर्वरित रक्कम अदा करण्याच्या प्रस्तावास मान्यतेबाबत.

महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन निर्णय क्रमांकः ईगव्ह-१५१९/प्र.क्र. ७ /संगणक

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,

विस्तार इमारत, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२

दिनांक:- ११ जूलै, २०१९

<u>वाचा :-</u>

१) उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचा,क्र.भाखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-३/उद्योग-४, दिनांक १.१२.२०१६ चा शासन निर्णय.

२) शासन निर्णय क्रमांक:ईगव्ह-१५१९/प्र.क्र.७/संगणक, दि.२९ मार्च, २०१९.

३) आशि/२०१९/ईगव्ह/DB२ License/ आस्था क्र.१४३/२६०४, दि.१८ एप्रिल, २०१९.

४) प्रकल्प अंमलबजावणी समिती दि.२१ जून, २०१९ च्या बैठकीचे इतिवृत्त.

<u>प्रस्तावना :-</u>

राज्यातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन ऑनलाईन पध्दतीने अदा करण्यासाठी शालार्थ प्रणाली वापरण्यात येते. सदर प्रणालीसाठी संदर्भ क्र.२ अन्वये डीबी-२ लायसन्स खरेदी करण्यास मान्यता देण्यात आली होती व त्याप्रमाणे एकल स्तोत्र पध्दतीने IBM कडून DB-२ लायसन्सची खरेदी करण्यात आली आहे. संदर्भ क्र.३ नुसार आयुक्त, शिक्षण, पुणे यांनी DB-२ लायसन्स नुतनीकरणाची उर्वरित १८ टक्के जीएसटी रक्कम अदा करण्याची विनंती केली आहे. सदर प्रस्तावास प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या दि.२१ जून, २०१९ रोजीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार DB2 License साठी उर्वरित रक्कम रु.३,३६,६००/- इतक्या खर्चाच्या प्रस्तावास मान्यता देण्याची बाब विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

शालार्थ प्रणालीसाठी डीबी-२ लायसन्सचे देयकावरील १८ टक्के जीएसटी रक्कम रु.३,३६,६००/- (तीन लाख छत्तीस हजार सहाशे रुपये) वितरीत करण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

२. सदरचा खर्च मागणी क्रमांक. ई-२, २२०२ सर्वसाधारण शिक्षण,८० पंचवार्षिक योजनांतर्गत योजना (०२) (५१) ई-गव्हर्नन्स कार्यक्रम (२२०२ H ४५४) ३१ सहायक अनुदाने या लेखाशिर्षातून सन २०१९-२० च्या उपलब्ध तरतुदीमधुन भागविण्यात यावा. यासाठी आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना नियंत्रक व सहायक संचालक, (लेखा) माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०७१२१६३७४२७६२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pravin Rajaram Mundhe

Digitally signed by Pravin Rajaram Mundhe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8cc298cb2ba38f035e6bd1a51789c7ed1ed4f4fce865eda3495969f77d97c89a, cn=Pravin Rajaram Mundhe
Date: 2019.07.12 16:44:07 +05'30'

(प्रविण मुंढे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१) मा.अ.मु.स. वित्त विभाग, यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
२) मा.अ.मु.स. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
३) मा.प्र.स.माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई
४) आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
५) आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे
६) महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर १/२.,
७) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर १/२.
८) जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
९) निवडनस्ती/संगणक कार्यासन.